आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२३ जून २०२६ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- राष्ट्रपतींच्या हस्ते आज दुसऱ्या टप्प्यातल्या  पद्म पुरस्कारांचं वितरण
- नैऋत्य मोसमी पावसाची महाराष्ट्रासह तेलंगणा, ओदिशा, बिहारच्या काही भागात आगेकूच
- कतार मधे गॅस रिफायनरीमधे झालेल्या स्फोटात १२ भारतीय नागरिकांचा  मृत्यू

**आणि**

- अमेरिकन खुल्या बॅडमिंटन स्पर्धेला आजपासून प्रारंभ

**<><><><><>**

राष्ट्रपती भवनात आज संध्याकाळी होणाऱ्या समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते पद्म पुरस्कार प्रदान केले जातील. पद्म पुरस्कार सोहळ्याच्या दुसऱ्या टप्प्यात राष्ट्रपती ६५ मान्यवरांचा पद्म पुरस्कार देऊन सन्मान करतील. टेनिसपटू विजय अमृतराज, अभिनेता मामुटी, पार्श्वगायिका अलका याज्ञिक आणि क्रिकेटपटू रोहित शर्मा या मान्यवरांचा यात समावेश आहे.

यावर्षी केंद्र सरकारनं एकूण १३१ पद्म पुरस्कारांची घोषणा केली असून, यात ५ पद्मविभूषण, १३ पद्मभूषण आणि ११३ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. पुरस्कार विजेत्यांमध्ये १९ महिलांचा समावेश असून १६ जणांना मरणोत्तर सन्मानित केलं जाईल.

**<><><><><>**

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज नवी दिल्लीत एल निनोच्या संभाव्य परिणामांच्या पार्श्वभूमीवर हवामान  बदल आणि त्याचा शेतीवर पडणारा प्रभाव यासंदर्भात आढावा बैठक घेतली.

या बैठकीत विविध राज्यांचे कृषिमंत्री, सचिव, जिल्हाधिकारी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. यंदा कमी पावसाची शक्यता लक्षात घेऊन आवश्यक तयारी, पर्यायी पीक नियोजन आणि शेतकऱ्यांच्या हिताचं संरक्षण याबाबत बैठकीत चर्चा झाली. एल निनोमुळे उद्भवू शकणाऱ्या परिस्थितीचा विचार करून केंद्र सरकार शेतकऱ्यांचं हित जपण्यासाठी आणि शेतीवर होणारे प्रतिकूल परिणाम टाळण्यासाठी वचनबद्ध असल्याचं चौहान यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

नैऋत्य मोसमी पाऊस आज मध्य अरबी समुद्राचा उर्वरित भाग, मुंबईसह महाराष्ट्राचा आणखी काही भाग, तेलंगणा आणि ओदिशाचा उर्वरित भाग, तसंच छत्तीसगड, झारखंड आणि बिहारच्या आणखी काही भागात पुढे सरकला.

येत्या २ ते ३ दिवसांत उत्तर अरबी समुद्र, गुजरातचा काही भाग, महाराष्ट्र आणि छत्तीसगडचा आणखी काही भाग, आणि मध्य प्रदेशच्या काही भागांत मान्सून पुढे सरकण्यासाठी, आणि त्यानंतरच्या ३ ते ४ दिवसांत झारखंड आणि बिहारचा उर्वरित भाग आणि उत्तर प्रदेशच्या काही भागांत मान्सून पोहोचण्यासाठी परिस्थिती अनुकूल असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

<><><><><>

महाराष्ट्रात वीज निर्मिती केंद्राला पुरवला जाणारा कोळसा काही प्रमाणात निकृष्ट दर्जाचा असल्यामुळे वीज निर्मिती संचात बिघाड होत असून कोळसा पुरवठ्याबाबत नव्याने निविदा काढल्या जातील तेव्हा पुरवठादार निकृष्ट मालाचा पुरवठा करणार नाहीत याची खबरदारी घेतली जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितलं. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी प्रश्नोत्तराच्या तासात विचारलेल्या प्रश्नाला ते विधानसभेत उत्तर देत होते. राज्यात वीज निर्मिती केंद्रातले संच वारंवार बंद पडत आहेत याकडे वडेट्टीवार यांनी सभागृहाचं लक्ष

वेधलं. अधिक क्षमतेचे वीज निर्मिती संच उभे करणार का, असा प्रश्न त्यांनी विचारला, त्यावर चंद्रपूर येथे ८०० मेगावॅट सुपर क्रिटिकल प्रकल्पाबाबत पाहणी सुरू असल्याची माहिती सरकारने दिली.

**<><><><>**

वडाळा-ठाणे-कासारवडवली मेट्रो-४ मार्गिकेच्या कामादरम्यान मुलुंड पश्चिम इथं संरक्षण कठडा कोसळून एकाचा मृत्यू, तर तिघे जखमी झाल्याप्रकरणी सल्लागार कंपनीच्या दोन आणि कंत्राटदाराच्या तीन अशा ५ जणांना अटक केली असून कंत्राटदाराला ५ कोटी रुपये, तर सल्लागाराला १ कोटी रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज लेखी उत्तराद्वारे विधानपरिषदेत दिली. प्रसाद लाड यांनी याबाबतचा प्रश्न उपस्थित केला होता.

राज्यात दूध आणि दुग्धजन्य पदार्थांमध्ये होणारी भेसळ रोखण्यासाठी दूधभेसळ अधिनियम तयार करायचं काम सुरू असून त्यात भेसळीच्या गंभीरतेनुसार ६ महिने ते आजन्म तुरुंगवास आणि १० लाख रुपयांच्या दंडाची तरतूद प्रस्तावित आहे, अशी माहिती अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी आज विधानपरिषदेत लेखी उत्तराद्वारे दिलं.

**<><><><>**

केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार तसंच मत्स्योत्पादन, पशुपालन आणि दुग्धव्यवसाय राज्यमंत्री जॉर्ज कुरियन यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांचा राजीनामा स्वीकारला.

**<><><><>**

अयोध्या इथल्या राम मंदिराला मिळालेल्या देणग्यांशी संबंधित अफरातफरीच्या आरोपांची चौकशी करणाऱ्या विशेष तपास पथकानं आपला प्राथमिक चौकशी अहवाल उत्तर प्रदेश सरकारला सादर केला आहे. गृहविभागाचे

अतिरिक्त मुख्य सचिव संजय प्रसाद यांच्याकडे लखनौचे विभागीय आयुक्त विजय विश्वास पंत यांनी हा अहवाल सादर केला. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, अद्याप तपास सुरू असून त्यासंबंधीची अधिक माहिती गोळा केली जात आहे. अयोध्येतल्या राम मंदिराला मिळालेल्या देणग्यांचा गैरवापर झाल्याच्या आरोपांनंतर मंदिराच्या विश्वस्त समितीच्या विनंतीवरून राज्य सरकारने १३ जून रोजी या विशेष तपास पथकाची स्थापना केली होती.

<><><><><>

शिक्षक भरती परीक्षेतल्या कथित फेरफार प्रकरणाच्या संदर्भात चेन्नई, तिरुचिरापल्ली, कोईम्बतूर आणि मदुराई इथल्या १८ ठिकाणांवर ईडीने छापे टाकले आहेत. २०१७ मध्ये केंद्रीय गुन्हे शाखेने नोंदवलेल्या तक्रारीची दखल घेत, ही कारवाई केल्याचं ईडीने म्हटलं आहे. तसंच पोलिसांनी २०२१ मध्ये या प्रकरणात आरोपपत्र दाखल केल्याचं नमूद केलं आहे.

<><><><><>

कतार मधल्या 'रास लाफान' इथं रविवारी रात्री झालेल्या स्फोटात १२ भारतीय नागरिकांचा मृत्यू झाल्याचं स्थानिक प्रशासनानं जाहीर केलं आहे. दोहा इथल्या भारतीय दूतावासानं समाज माध्यमावर ही माहिती दिली.

कतारमधल्या सर्वात मोठ्या गॅस रिफायनरीमध्ये रविवारी झालेल्या स्फोटात १३ जणांचा मृत्यू झाला, तर ६६ जण जखमी झाले. रास लाफान औद्योगिक क्षेत्रातल्या मुख्य एलएनजी रिफायनरीमध्ये झालेल्या तांत्रिक बिघाडामुळे हा अपघात घडल्याचं कतारच्या गृह मंत्रालयानं म्हटलं आहे.

या दुर्घटनेबद्दल परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी शोक व्यक्त केला आहे. दोहा इथला भारतीय दूतावास कतारच्या अधिकाऱ्यांच्या संपर्कात असून भारतीय नागरिकांच्या कुटुंबीयांना सहाय्य करत असल्याचं त्यांनी समाज माध्यमवरच्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे.

दरम्यान, या अपघाताचा देशाच्या निर्यातीवर कोणताही परिणाम होणार नसल्याचं कतारचे ऊर्जा मंत्री साद शेरिदा अल-काबी यांनी म्हटलं आहे. 'रास लाफान बंदर' हे जगातलं सर्वात मोठं कृत्रिम बंदर असून, या ठिकाणी जगातली सर्वात मोठी एलएनजी निर्यात सुविधा आहे. या वर्षाच्या सुरुवातीला इराणने या बंदरावर हल्ले केले होते.

<><><><><>

अपारंपरिक धोक्यांनी देशांच्या सीमा पार केल्या असून, सुरक्षे पुढली नवी आव्हानं ओळखून जगानं सावध राहणं गरजेचं असल्याचं राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं आयोजित 'ब्रिक्स' देशांच्या राष्ट्रीय सुरक्षा सल्लागारांच्या १६ व्या बैठकीत बोलत होते. या बैठकीत अपारंपरिक सुरक्षाविषयक आव्हानांवर विशेष चर्चा होईल असं ते म्हणाले.

<><><><><>

अमेरिकेत कॅलिफोर्निया इथं अमेरिकन ओपन सुपर बॅडमिंटन स्पर्धेला आजपासून सुरुवात होत आहे.  या स्पर्धेत लक्ष्य सेन आणि तन्वी शर्मा भारताचं नेतृत्व करतील. जागतिक क्रमवारीत १४व्या स्थानावर असलेला लक्ष्य सेन पुरुष एकेरीच्या पहिल्या फेरीत बेल्जियमच्या जुलियन कैरागी याच्याशी सामना करणार आहे, किदंबी श्रीकांतचा सामना  चायनीज तैपेईच्या खेळाडूशी होणार आहे. साईनाथ दयानंद आपल्या मोहिमेची सुरुवात जपानच्या खेळाडू विरुद्ध करेल.

महिला एकेरीत भारताच्या सात बॅडमिंटनपटू मुख्य फेरीत सहभागी आहेत. त्यात पाचवी मानांकित तन्वी शर्मा आणि सहावी मानांकित देविका सिंग यांचा समावेश आहे. पहिल्या फेरीत तन्वी शर्माचा सामना जर्मनीच्या येवोन ली बरोबर होईल. महिला दुहेरीत तेरेसा जॉली आणि गायत्री गोपीचंद यांची जोडी स्पेनच्या खेळाडूंचा सामना करेल. तर मिश्र दुहेरीत सातव्या मानांकित ध्रुव रावत आणि

मिनाक्षी के यांची जोडी इंडोनेशियाच्या खेळाडू विरुद्ध लढून आपली मोहीम सुरू करेल.

**<><><><><>**

फिफा विश्वचषक स्पर्धेत फ्रान्सच्या संघानं गट ‘आय’ मधल्या सामन्यात इराकच्या संघावर ३-० असा विजय मिळवून नॉकआऊट फेरीत आपलं स्थान निश्चित केलं. तर अर्जेंटिनानं गट ‘जे’ मधल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाला २-० असं पराभूत करून ३२ संघांच्या फेरीत स्थान मिळवलं.

//<><><><><>//